25 JUL 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शोभिवंत मासे संगोपनातून रोजगार निर्मिती

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : 'कौशल्यावर आधारित शिक्षण द्यावे : शोभिवंत माशांचे संगोपन व नियोजन'वर कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण देण्यापेक्षा कौशल्यावर आधारित शिक्षण दिले तर उद्योजकता व रोजगार निर्मिती होईल. सध्या मोठमोठ्या शहरामध्ये शोभीवंत मासे संगोपन करण्याचे प्रमाण वाढत आहे. भविष्यात यातून रोजगार निर्मितीची मोठी संधी आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभाग व रत्नागिरी येथील मत्स्य व्यवसायिक कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' शोभीवंत माशांचे संगोपन व नियोजन" या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने विद्यापीठाला ११ कोटी रूपयांचे अनुदान दिले आहेत. या अनुदानातून विद्यापीठातील ३८ अधिविभागात कौशल्य विकासावर आधारित एक कार्यक्रम राबवला जाणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देवून, रोजगार उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. प्राणीशास्त्र विभागाने आयोजित केलेली शोभीवंत मासे संगोपन ही पहिलीच कार्यशाळा आहे. प्रत्येक विभागाला ४५ हजार रूपये अनुदान दिले जाणार आहे.

विज्ञान तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, स्थानिक लोकांच्या गरजा ओळखून, त्यानुसार व्यवसाय केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी झोकून देवून कोणताही व्यवसाय केला तर रोजगार क्षमता निर्माण केल्या पाहिजेत. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत म्हणाले, विद्यार्थ्यांनी नुसताच प्राणीशास्त्राचा अभ्यास न करता, मत्स्य, पोल्ट्री, दूध डेअरी, रेशीम आदी व्यवसायावर आधारित प्रशिक्षण घेतले पाहिजे. यातून मूल्यवर्धीत उत्पादन आपोआप वाढेल.

प्रा. शारंगधर म्हणाले, शोभीवंत मासे पाळण्याच्या टँकची निर्मिती कशी करायची, कोणत्या जातीचे मासे पाळायचे, या माशांना लागणारे खाद्य प्रकार, तसेच टँक कसा तयार करायचा याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. रत्नागिरी येथील मत्स्य व्यवसायिक कॉलेजचे प्रा. चव्हाण मासे संगोपनासाठी जनजागृती केली पाहिजे. मासे संगोपनासाठी लागणाऱ्या टाक्या कमी खर्चात कशा उपलब्ध करून द्यायच्या याविषयीत मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. ए. डी. जाधव यांनी करून दिली. सुत्रसंचालन डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी केले. यावेळी डॉ. एम. पी. बेलाळे आरआयटीच्या विद्यार्थ्यांनी तेजस्विनी जाधव, मयूरी बाबर, सायली बेलवडीकर, अश्विनी जाधव यांच्यासह पर्यावरण, वनस्पती, प्राणीशास्त्र विभागाचे १५० विद्यार्थी उपस्थित होते.




कोल्हापूर : प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. व्ही. एस. मन्ने, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. पी. एस. पाटील आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JUL 2018
Times of India

# COLOURFUL TREAT

Rahul Gayakwad



A peacock became the centre of attraction on the Shivaji University campus on Tuesday

लोकमत

## ‘स्मृतितरंग’च्या प्रकाशनावेळी पाहुण्यांची अपेक्षा : निवृत्तीनंतर उल्लेखनीय सेवा बजविण्याचा वस्तुपाठ

# आर. व्ही. भोसले यांना पद्मश्री पुरस्कार मिळावा


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अवकाश संशोधनात उल्लेखनीय कामगिरी करणारे, कोल्हापूरचा नावलौकिक वाढविणारे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांना सरकारकडून ‘पद्मश्री’ पुरस्कार मिळावा, अशी अपेक्षा ‘स्मृतितरंग’च्या प्रकाशनावेळी प्रमुख पाहुण्यांनी मंगळवारी व्यक्त केली.

डॉ. भोसले यांच्या स्वानुभव मांडलेल्या ‘स्मृतितरंग’ पुस्तकाचे प्रकाशन साईक्स एक्स्टेन्शन येथील श्री महालक्ष्मी हॉलमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी विजया भोसले, ‘गोकुळ’चे ज्येष्ठ संचालक अरुण नरके, मराठी विज्ञान परिषदेचे शिवाजीराव पवार, विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. भोसले यांना पद्मश्री पुरस्कार मिळावा यासाठी पाठपुराव्याची नैतिक जबाबदारी विद्यापीठाची राहील. डॉ. भोसले यांनी विद्यापीठ, राजाराम महाविद्यालयात मानधन न घेता २८ वर्षे केलेले ज्ञानदान, अवकाश संशोधन अभ्यासक्रम, केंद्राचा प्रारंभ यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांचे हे कार्य म्हणजे निवृत्तीनंतर उल्लेखनीय सेवा बजाविण्याचा आदर्श वस्तुपाठ आहे.

अरुण नरके म्हणाले, डॉ. भोसले यांना पद्मश्री मिळण्यासाठी विद्यापीठाने सरकारकडे पाठपुरावा करावा, त्याला कोल्हापूरकरांची साथ मिळेल. शिवाजीराव पवार म्हणाले, डॉ. भोसले यांचे व्यक्तिमत्त्व अजातशत्रू आहे. त्यांना सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करावे.

पी. एस. पाटील म्हणाले, त्यांचे ‘स्मृतितरंग’ हे पुस्तक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारे आहे. या कार्यक्रमास ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, ज्येष्ठ पत्रकार सुभाष देसाई, ए. एम. गुरव, स्मृतिका पाटील, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात मंगळवारी ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या ‘स्मृतितरंग’ पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून अरुण नरके, शिवाजीराव पवार, पी. एस. पाटील, विजया भोसले, पी. टी. पाटील उपस्थित होते.

### विद्यापीठ अवकाश संशोधनात कमी

अवकाश संशोधनामध्ये शिवाजी विद्यापीठ कमी पडत असल्याची खंत डॉ. भोसले यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले, विद्यापीठाने या संशोधनाकडे लक्ष द्यावे. कॅनडामध्ये असताना मी आणि पी. व्ही. कुलकर्णी यांना पन्हाळगडावर अवकाश केंद्र साकारावे असे सुचले. ते स्वप्न प्रत्यक्षात पूर्ण झाल्याचा मला आनंद आहे.

# ‘अवकाश संशोधनात भोसलेंचे मोठे योगदान’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

‘देशाच्या अवकाश संशोधनात आर. व्ही. भोसले यांनी अतुलनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यांचा गौरव म्हणून त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करायला हवे. त्यासाठी पाठपुरावा करणे आपले नैतिक कर्तव्य आहे,’

## डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या स्मृतितरंग' पुस्तकाचे प्रकाशन

असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले लिखित ‘स्मृतितरंग’ पुस्तक प्रकाशन समारंभात ते मंगळवारी बोलत होते. प्रकाशन सोहळा जि.प. कर्मचारी सभागृहात पार पडला.

डॉ. शिर्के म्हणाले, ‘अवकाश संशोधनात गाढा अभ्यास असलेले व्यक्तिमत्त्व कोल्हापूरला लाभले आहे.




ज्येष्ठ अवकाश संशोधक डॉ. आर. व्ही. भोसले लिखित ‘स्मृतितरंग’ पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी अरुण नरके, शिवाजीराव पवार, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. व्ही. भोसले, विजयाताई भोसले, आदी.

त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घ्यायला आपण काही प्रमाणात कमी पडलो आहे. अवकाश संशोधनात त्यांनी केलेल्या कार्यांचे प्रतिबिंब त्यांच्या स्मृतितरंग पुस्तकात आढळते. शिवाजी विद्यापीठ आणि इस्रो अवकाश संशोधन केंद्राचे नाते घट्ट करण्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. पन्हाळ्यावर स्पेस सेंटर सुरू करण्यात त्यांचा पुढाकार महत्त्वाचा होता. आपल्या ज्ञानाचा फायदा भावी पिढ्यांना व्हावा या हेतूने त्यांनी आयुष्यभर विनामूल्य ज्ञानदानाचे काम केले. त्यांनी लिहिलेले हे पुस्तक तरुणांना प्रेरणादायी ठरणार आहे. संशोधन करू पाहणाऱ्या तरुण पिढीसाठी स्मृतितरंग पुस्तक दिशादर्शक ठरेल.’

डॉ. आर. व्ही. भोसले म्हणाले, ‘संशोधनाच्या माध्यमातून जगभरात प्रवास केला, पण कोल्हापूरची ओढ कायम राहिली. यानिमित्ताने ती ओढ पूर्ण झाली. अवकाश संशोधनात कोल्हापूरचा सहभाग वाढला पाहिजे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचा आनंद होत आहे. शिवाजी विद्यापीठात अवकाश संशोधनात पदव्युत्तर शिक्षण घेऊन अवकाश संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेले अनेक विद्यार्थी तयार झाले आहेत. यापुढेही अवकाश संशोधनासाठी कार्यरत राहणार आहे.’

यावेळी ‘गोकुळ’चे संचालक अरुण नरके, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार, विजयाताई भोसले, शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील, पी. टी. पाटील, मराठी विज्ञान परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव पवार, सुरेश शिपूरकर, सुभाष देसाई, स्मृतिका पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.